अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास
विकास महामंडळ - कर्ज योजना ...

**महाराष्ट्र शासन**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग**
शासन निर्णय क्रमांक-इडब्ल्यूएस १६९९/प्र.क्र.३६/रोस्वरो-१,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ८ ऑक्टोबर, १९९९

वाचा : १. शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग
क्र.इडब्ल्यूएस १०९८/प्र.क्र.३६३/रोस्वरो-१, दि.२७.११.१९९८
२. शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग
क्र.इडब्ल्यूएस १६९८/प्र.क्र.५८४/रोस्वरो-१, दि.१९.३.१९९९
३. शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग
क्र.आपमं १०९९/प्र.क्र.७७/रोस्वरो-१, दि.१६.६.१९९९

**प्रस्तावना :**

राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य करुन त्यांचा विकास साधण्याकरिता दि.१५.८.९८ रोजी महाराष्ट्र शासनाने "अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची" स्थापना करण्याची घोषणा केली. त्यास अनुसरुन महामंडळाची कंपनी कायदा १९५६ अन्वये दि.२७.११.१९९८ रोजी नोंदणी करण्यात आली आहे. हे महामंडळ आता विधीवत अस्तित्वात आलेले आहे. या महामंडळाचे मुख्य काम आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील युवकांना रोजगारासाठी थेट कर्ज योजना, बीज भांडवल कर्ज योजना व गट प्रकल्प कर्ज योजना अंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देऊन त्यांचा आर्थिक विकास साधणे हे राहणार आहे. तेव्हा या महामंडळाचे कर्ज धोरण काय असावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
18 OCT 1999

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत खालील कर्ज योजना राबविण्यात येतील. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

१. थेट कर्ज योजना - या योजनेमध्ये शासनाने विहित केलेल्या दुर्बल घटकातील अर्जदारास रुपये २५,०००/- इतके थेट कर्ज घेता येईल. या कर्जावर ४ टक्के इतके व्याज आकारण्यात येईल. कर्जासाठी दोन जामीनदार द्यावयाचे असून पैकी एका



21 OCT 1999

जामीनदाराने कर्जासाठी तारण द्यावयाचे आहे. व्यवसायाचे स्वरुप पाहून परतफेडीचे हप्ते सुरु करण्यात येतील. मात्र हा कालावधी सहा महिन्यांपर्यंतच राहील. या कर्जाची वसुली ५० टक्के मुद्दल व ५० टक्के व्याज याप्रमाणे दरमहा करण्यात येईल. परतफेडीची मुदत ३ वर्षे राहील.

२. बीज भांडवल कर्ज योजना : या योजनेत लाभार्थीला रु.२,००,०००/- पर्यंत कर्ज देता येईल. त्यावर ४ टक्के व्याज आकारण्यात येईल. कर्जासाठी दोन जामीनदार द्यावयाचे असून पैकी एका जमीनदाराने कर्जासाठी तारण द्यावयाचे आहे. या योजनेखाली यंत्रसामुग्री, साधनसामुग्री घ्यावयाची असल्यास ती तारण म्हणून ठेवता येईल. यासाठी बँकेमार्फत ६० टक्के व महामंडळामार्फत ४० टक्के रक्कम देण्यात येईल. परतफेडीची मुदत ५ वर्षे राहील. परतफेडीचे हप्ते व्यवसायाच्या स्वरुपावर अवलंबून राहतील. तथापि कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी दिली जाणार नाही. वसुली दरमहा करण्यात येईल व ५० टक्के रक्कम मुद्दल व ५० टक्के व्याजाची रक्कम वसुल करण्यात येईल. या योजनेस सबसिडी दिली जाणार नाही.

३. गट प्रकल्प योजना : या योजनेसाठी एकत्रित किमान ११ लाभार्थी राहतील. या प्रकल्पासाठी जास्तीत जास्त रुपये २५,००,०००/- इतकी कर्ज मर्यादा राहील. हे कर्ज ६०:४० या प्रमाणात बँक व महामंडळ देईल. वसुलीचा कालावधी ५ वर्षांपर्यंतचा राहील. कर्ज वसुली व्यवसायाच्या स्वरुपावर राहील. तथापि सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी परतफेडीसाठी दिला जाणार नाही. व्याजाचा दर ५ टक्के राहील. वसुली दरमहा करण्यात येऊन ती ५० टक्के मुद्दल व ५० टक्के व्याज अशाप्रकारे करण्यात येईल. या योजनेत देखील तारण घेण्यात येईल. ही योजना प्रत्येक जिल्ह्यासाठी एक याप्रमाणे राहील.

सध्या या ३ योजना राबविण्यासाठी महामंडळाकडे जिल्हा व विभागीय स्तरावर स्वतःचा कर्मचारीवृंद उपलब्ध नसल्यामुळे या कामासाठी टप्प्याटप्प्याने अशी पदे निर्माण करण्यात येतील आणि इतर तोटयात चालणा-या महामंडळातील अतिरिक्त कर्मचा-यांच्या समायोजनाने भरण्यात येतील. तथापि या महामंडळाच्या वरील योजनांच्या अंमलबजावणीस त्वरीत सुरुवात करण्याच्या दृष्टीने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांकडून ह्या कामास सुरुवात करावयाची आहे. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे लाभार्थ्यांसाठी योजनेची माहिती पुस्तिका व अर्ज विक्रीसाठी ठेवण्यात येतील. असे अर्ज लाभार्थ्यांकडून भरुन घेतले जाऊन हे अर्ज महामंडळाच्या मुख्यालयाकडे पाठविण्यात येतील. त्यानंतर त्यास छाननीनंतर मंजुरी देण्यात येईल. अशी मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना कर्जाचे वाटप सध्या महामंडळाच्या मुख्यालयातून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येईल.

शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.आपमं १०९९/प्र.क्र.७७/रोस्वरो-१, दि.१६.६.१९९९ अन्वये ''आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाची व्याख्या'' करण्यात आलेली आहे. सदरच्या व्याख्येमध्ये ज्यांचा समावेश होतो असे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवार या योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ अनुक्रमे २१४१४४३, दि.२३.६.९९ आणि क्रमांक ३७०/९९/साऊ, दि.६.७.९९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र.ग.पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री महोदयांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव
श्री.किशनराव वरखिंडे, अध्यक्ष, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ
व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ
प्रधान सचिव, नियोजन विभाग,
प्रधान सचिव, वित्त विभाग
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
महालेखापाल, महाराष्ट्र-१ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-१, लेखापरीक्षा, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखा परीक्षा, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, रोजगार व स्वयंरोजगार म.रा. कोकण भवन, नवी-मुंबई
सर्व जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,
रोजगार व स्वयंरोजगार विभागातील सर्व कार्यासन
निवड नस्ती